**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ४५/२०१८ मधील निशाणी क्र. ३० वरील आदेश</u>**

(अक्षय सुनिल गावडे वि. प्रेमल वसंत वाघ)

प्रस्तुत अर्ज वादीने प्रतिवादी क्र. १ यांच्याविरूध्द झालेला अबेटमेंट आदेश सेट असाईड करून मिळणेकरीता केलेला आहे. दाव्याचे कामकाज सुरू असताना प्रतिवादी क्र. १ प्रेमल वसंत वाघ यांचे निधन दिनांक २७/०८/२०२२ रोजी निधन झाले. त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस सुमारे आठ महिन्यांचा उशीर झालेला आहे. प्रतिवादी क्र. १ चे निधन पुणे येथे झाल्याने वादीस सदरची माहिती होण्यास उशीर झाला. दावा प्रतिवादी क्रमांक १ विरूध्द एकतर्फा होता म्हणून वादीस प्रतिवादी क्र. १ च्या निधनाची माहिती वेळेत मिळू शकली नाही. सबब त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास उशीर झालेला आहे. सबब प्रतिवादी क्र. १ चे वारस रेकॉर्डवर घेणे संदर्भातील अबेटमेंट सेट असाईडचा आदेश होण्याची विनंती केली.

**०२.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा ०५ वर्षे जुना आहे. दावा हा निरंतर ताकिद व ठरावाकरीता दाखल केलेला आहे. अर्जासोबत निशाणी ३१ कडे प्रतिज्ञापत्र दाखल आहे. प्रतिवादी क्र. १ या दिनांक २७.०८.२०२२ रोजी मयत झाल्याचे वादीने कथन केलेले आहे. मुदतीच्या कायदान्वये ९० दिवसांच्या आत मयताचे वारस अभिलेखावर घेणे क्रमप्राप्त आहे. वादीचा अर्ज दिनांक १०.०८.२०२३ रोजीचा आहे. प्रस्तुत अर्ज दाखल करणेस निश्चितच विलंब झालेला आहे. तथापि न्यायाच्या दृष्टीने दाव्यामधील आवश्यक पक्षकार त्यांचे वारस आणि त्यांचे म्हणणे पुरावे दाव्याकामी समाविष्ट करून घेणे हे दाव्याचा गुणदोषावर अंतीम निकाल होण्याकामी आवश्यक आहे. दाव्यामध्ये मिळकतीबाबत असलेला कायदेशीर हक्क अधिकार याबाबतचे प्रश्न महत्वपुर्ण आहेत. सबब न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादी क्र. १ यांच्याविरूध्द अबेट झालेला दावा रदद करून त्यांच्या वारसांना दाव्यामध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे. सबब न्यायाच्या दृष्टीने खालील आदेश पारीत करीत आहे.

# <u>आदेश</u>

१. निशाणी ३० खर्च रक्कम रूपये १००/— भरण्याच्या अटीवर मंजुर करून प्रतिवादी क्र. १ यांच्या विरूध्दचा दावा अबेटचा आदेश रदद करण्यात येतो.

२. खर्च रक्कम रूपये १००/—सरकार जमा करण्याचा आदेश पारीत.

दिनांक: १०.०८.२०२३

(**एम. ए. के. शेख**)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
घोडेगाव